**प्रेस नोट दिनांक ०८/०६/२०१९**

**खडक पोलीस ठाणे, पुणे शहर**

**नजर चुकीने वाहनांची अदला-बदल झालेल्या वाहन मालकाचा शोध घेवून दोन्ही वाहने मालकांचे ताब्यात परत.**

-----------||-----------

दि. ०७.०६.२०१९ रोजी खडक पोलीस ठाणे अंकित रामोशीगेट पोलीस चौकी येथे रात्रपाळी कर्तव्यावर डयुटी अंमलदार म्हणुन पो.ना. ६५६८ भोसले हजर असताना, इसम नामे इमरान इलाई आत्तार वय ३५ वर्षे, रा. फ्लॅट नं. ०१, कुमार प्रिमीयम सोसायटी, चुडामन चौकाजवळ भवानी पेठ पुणे यांनी येवून कळविले की, त्यांची होन्डा कंपनीची ॲक्टीव्हा एम.एच.१२.जे.ई.८३१२ ही सोसायटीमध्ये पार्क केल्या ठिकाणी मिळुन येत नसलेबाबत कळविले. सदरवेळी नमुद कर्मचारी व बीट मार्शलवरील कर्मचारी पो.शि. वालकोळी व पो.शि. गोसावी असे घटनास्थळी गेले असता, सदर ठिकाणी तक्रारदार यांचे वर्णनाप्रमाणेच होन्डा ॲक्टीव्हा सदर ठिकाणी पार्क असल्याचे दिसले. सदरवेळी नमुद कर्मचारी यांनी तक्रारदार यांचेकडे चौकशी केली असता, सदरची गाडी त्यांचे सोसायटीमधील नसल्याचे सांगितले.

सदर ठिकाणावर गाडीबाबत अधिक चौकशी केली असता, मुन्नाभाई म्हणुन असलेल्या एका व्यक्तीने सांगितले की, सदरची पार्क केलेली होन्डा कंपनीची ॲक्टीव्हा गाडी त्यांचे ओळखीचे समीर खान यांची असल्याचे सांगितले. इसम नामे समीर खान यांचेकडे गाडीबाबत चौकशी केली असता, त्यांनी सांगितले की, त्यांची व तक्रारदार यांची ॲक्टीव्हा गाडी एकाच कलरची असल्यामुळे व सदर गाडीस चावी लागली असल्याने त्यांनी त्यांचीच गाडी आहे असे समजुन गेले असल्याचे सांगितले. समीर खान यांनी तक्रारदार यांची गाडी तात्काळ कुमार प्रिमीयम सोसायटी, चुडामन चौकाजवळ भवानी पेठ पुणे येथे घेवून येवून नजर चुकीमुळे व एकाच कलरच्या गाडी असल्यामुळे चेंज झाली असल्याचे सांगितले. तक्रारदार इमरान आत्तार यांची गाडी त्यांचे ताब्यात मिळाली असून त्यांची समीर खान यांचेविरूध्द कोणत्याही प्रकारची तक्रार नसल्याचे सांगुन त्यांनी त्यांची होन्डा ॲक्टीव्हा गाडी योग्य ती खातरजमा करून त्यांचे ताब्यात देण्यात आलेली आहे.

**( भरत जाधव )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
खडक पोलीस ठाणे, पुणे शहर.

